# साय-फाय आर्ट्स फेस्टिव्हल शनिवारी

**पुणे :** 'सिक्युरिंग फ्युचर्स' (भविष्य सुरक्षित करणे) या संकल्पनेवर 'क्विक हील'तर्फे विश्वकर्मा विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये १६ नोव्हेंबरला 'साय-फाय आर्ट्स फेस्टिव्हल' होणार आहे. 'सायबरविश्वातील मनुष्य जीवन' यावर यंदा फेस्टिव्हलचा भर असून, लघुपट, भित्तिपत्रके, कथाकथन आणि निबंध अशा विविध कलाप्रकारांत आविष्कार घडेल.

क्विक हील कंपनीने महाराष्ट्र सायबर पोलिस आणि विश्वकर्मा विद्यापीठाच्या सहकार्याने फेस्टिव्हल आयोजित केला आहे. या फेस्टिव्हलला तज्ज्ञांसोबतच चित्रपट समीक्षक प्रा. समर नखाते उपस्थित राहणार आहेत. सायबरसुरक्षेला चालना देण्यासाठी युवा अभिव्यक्तीच्या ताकदीच्या साह्याने समाजात ठसा उमटवणे असा फेस्टिव्हलचा उद्देश आहे. या फेस्टिव्हलद्वारे सायबरसुरक्षा जागृतीवर अधिक भर देण्याचे उद्दिष्ट आहे. डिजिटल भविष्य सुरक्षित करणे आणि 'डिजिटल प्रथम राष्ट्र' म्हणून भारतासाठी एक मोठा पाया तयार करणे, अशी उपक्रमाची दृष्टी असल्याचे क्विक हील टेक्नॉलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास काटकर यांनी सांगितले.

सायबर धोक्यांपासून रक्षण करू शकणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यास मदत होईल, असे महाराष्ट्र सायबरचे पोलिस उपमहानिरीक्षक हरीश बैजल यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे म्हणाले, की प्रतिष्ठित परीक्षकांच्या समितीने लघुयादीत समावेश केलेले स्पर्धक फेस्टिव्हलमध्ये सहभागी होतील. महोत्सवातील स्पर्धकांचे समाजमाध्यमावर प्रेक्षकांकडूनही मूल्यमापन करण्यात येईल.